SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR– 416 004 MAHARASHTRA
Phone : EPABX-2609000 **Stat Cell**: 0231-2609147.
website : www.unishivaji.ac.in
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर– ४१६ ००४ – महाराष्ट्र
दूरध्वनी: (ईपीएबीएक्स)२६०९००० सांख्यिकी कक्ष :०२३१-२६०९१४७.
E-Mail : statcell@unishivaji.ac.in
Estd : 1962
NAAC 'A++' Grade

**जा.क्र./शिवाजी वि./सांख्यिकी कक्ष/विद्यार्थी माहिती/२०२४-२५/93** **दिनांक : 08/04/2025**

# स्मरण परिपत्रक

**प्रति,**
**मा. प्राचार्य / संचालक,**
**सर्व संलग्नीत महाविद्यालये / मान्यताप्राप्त शैक्षणिक संस्था.**

**विषय :आपल्या अधिपत्याखालील शासकीय, अशासकीय अनुदानित व कायमविना / अनुदानित महाविद्यालयातील प्रवेशित विद्यार्थी संख्येची प्रवर्गनिहाय माहिती सादर करणेबाबत.**

**संदर्भ: १. जा.क्र./शिवाजी वि./सांख्यिकी कक्ष/विद्यार्थी माहिती/२०२४-२५/६५ दि.२९/०१/२०२५ रोजीचे या कक्षाचे स्मरण परिपत्रक.**
**२. जा.क्र./शिवाजी वि./सांख्यिकी कक्ष/विद्यार्थी माहिती/२०२४-२५/५७ दि.१२/११/२०२४ रोजीचे या कक्षाचे परिपत्रक.**
**३. जा.क्र. विशेष कक्ष/२०२४-२५/६२०/६० दि.३० मे, २०२४ रोजीचे परिपत्रक.**

**महोदय/महोदया,**

उपरोक्त संदर्भांकित विषयास अनुसरून आपणास आदेशान्वये कळविण्यात येते की, आपल्या महाविद्यालयातील **सन २०२४-२५** मधील प्रवेशित विद्यार्थी संख्येची माहिती सोबत जोडलेल्या विवरणपत्रानुसार देण्यात यावी असे कळविले होते. परंतू अद्याप आपल्या महविद्यालयाकडून सदरबाबतची महिती प्राप्त झालेली नाही.

सदर विद्यार्थी संख्येची माहिती शासनास तसेच स्थायी समितीपुढे सादर करावयाची असल्याने सदरची माहिती दि. १५/०४/२०२५ पुर्वी सांख्यिकी कक्षाकडे पाठविण्यात यावी जेणेकरुन विद्यापीठाची माहिती वेळेत सादर करता येईल. नमुद केलेल्या दिनांकापूर्वी आपल्या महाविद्यालयाने माहिती न पाठविल्यास स्थायी समितीच्या नियमानुसार होणाऱ्या दंडात्मक कार्यवाहीस आपले महाविद्यालय जबाबदार राहील याची कृपया नोंद घ्यावी. **तसेच आपल्या महाविद्यालयाने फक्त सॉप्ट कॉपी ई-मेल आयडीवर पाठविलेली असेल तर सदर माहितीची हार्ड कॉपी विद्यापीठास तात्काळ सादर करावी.**

**सूचना:- संगणक केंद्राने विकसित केलेल्या प्रणालीत महाविद्यालयांना Pro-rata Base मध्ये विद्यार्थी संख्या नोंद करण्याची सोय Exam Portal या मथळयात Registration Tab मध्ये देण्यात आलेली आहे. सदर प्रमाणे संगणक प्रणालीत नोंद केलेली विद्यार्थी संख्या व उपरोक्त विवरणपत्रा प्रमाणे पाठविण्यात येणारी विद्यार्थी संख्या समान असणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने महाविद्यालयांनी सदर प्रणाली मध्ये योग्य ती विद्यार्थी संख्या नोंद करुन त्यामधील Fresh Student Report तपासून सही शिक्कासहीत प्रमाणित करुन या कक्षास उपरोक्त विवरणपत्राच्या हार्ड कॉपी सोबत पाठवून देण्यात यावी.**

कळावे.

आपला विश्वासू,

**कुलसचिव**